## प्रकरण ३रे

# अर्थशास्त्रीय मुलभूत संकल्पना

# मानवच्या मुलभूत गरजा









**अन्न** **वस्त्र** **निवारा**

8jU4PjEMyVrgee5oGYAw&ved=0CAgQ_AUoAg&biw=1024&bih=630#facrc=_&imgdii=UVCPNbI3e_8WrM%3A%3BxBbHa-4ewtQutM%3BUVCPNbI3e_8WrM%3A&imgrc=UVCPNbI3e

https://www.google.co.in/search?q=मूलभूत+गरजा&source=lnms&tbm=isch&sa=X&ei=e-


अर्थशास्त्रीय मुलभूत संकल्पना
मानवी गरजा
अर्थ
वैशिष्ट्ये
वर्गीकरण
अत्यावश्यक गरजा
सुखदायी गरजा
चैनीच्या गरजा
वस्तू
मूर्त
अमूर्त
मूल्य
किंमत
किंमतीवरून वस्तूंचे प्रकार
मुक्त आर्थिकेतर वस्तू
आर्थिक वस्तू
साधने
उपयोगिता
मागणी
पुरवठा


अर्थशास्त्रीय
मुलभूत संकल्पना
मानवी गरजा
वस्तू
साधने
उपयोगिता
मागणी
पुरवठा
अर्थ
वैशिष्ट्ये
वर्गीकरण
मूर्त वस्तू
अमूर्त वस्तू
किंमतीवरून वस्तूचे प्रकार
मूल्य
किंमत
अत्यावश्यक गरजा
सुखदायी गरजा
चैनीच्या गरजा
मुक्त किंवा आर्थिकेतर वस्तू
आर्थिक वस्तू

# मानवाच्या मुलभूत गरजा







**वैद्यकीय सुविधा,** **शिक्षण**

https://www.google.co.in/search?q=मूलभूत+गरजा&source=lnms&tbm=isch&sa=X&ei=e-8jU4PjEMyVrgee5oGYAw&ved=0CAgQ_AUoAg&biw=1024&bih=630#q=zoo+zoo+pictures&tbm=isch&facrc=_&imgdii=_&imgrc=SSRRc

# पैसा

मानवी गरजा पूर्ण करण्यासाठी लागतो






http://prahaar.in/wp-content/uploads/2013/05/CURRENCY-SYMBOLS-1V-copy.jpg

विद्यार्थी मित्र-मैत्रिणींनो,मागील पाठात आपण अर्थशास्त्राची ओळख करून घेतली.आता आपल्याला अर्थशास्त्रातील काही मुलभूत संकल्पनांबाबत माहिती घेऊयात.

- मुलांनो,मानवी गरजा कोणत्या त्या तुम्हाला माहीत आहेत.कोणत्या ते सांगा बरे?
- हो,बरोबर अन्न,वस्त्र,निवारा,आरोग्य सुविधा,शिक्षण.
- पण काय एवढ्याच गरजा आहेत का मानवाच्या?कधी विचार केलात का याचा?
- नाही;आजच्या मानवाच्या गरजा अमर्याद आहेत.मग आपण या मानवी गरजा,त्यांची  वैशिष्ट्ये बघणार आहोत.


# मानवी गरजांची वैशिष्ट्ये



# मानवाच्या गरजांची ठळक वैशिष्ट्ये

**१)मानवी गरजा अमर्याद असतात**.

मानवाच्या गरजा अनेक असतात.एक गरज भागविली कि दुसरी निर्माण होते.या गरजांची एक साखळीच असते.उदा.अन्नाच्या गरजेचे पाहू.अन्नाची गरज भागविण्यासाठी आपण गहू,तांदूळ आणतो.त्याचा भात बनविण्यासाठी खालील सर्व घटकांची आवश्यकता असते.आणि मग तो भात शिजविल्यानंतर खाण्यास योग्य होतो.



## २)गरजा परस्परपूरक असतात.

एखादी गरज भागविताना मानवाला एकाचवेळी दोन किंवा अधिक  गोष्टींची गरज असते.उदा.शाळा म्हटले की पुस्तके,वह्या,पेन,पेन्सिल,खडू,फळा,विद्यार्थी शिक्षक इत्यादी गोष्टी येतात.


Z:\Content\Geography\Misc\human wants.mp4.mp4



# गरजा परस्परपूरक असतात.








# ३) गरजा स्पर्धात्मक असतात.

- मानवी गरजा एकमेकांशी स्पर्धा करतात.मानवाला आपल्या मर्यादित साधनांद्वारे त्या सर्व गरजा पूर्ण करता येत नाहीत. त्यामुळे त्या गरजांचा विचार प्राधान्यक्रमाने करावा लागतो व सर्वात जास्त गरजेची गोष्ट पूर्ण केली जात असते.उदा. तुम्हाला तुमच्या अभ्यासाची पुस्तके आणि तुमच्या आवडीची गेम(खेळ) या दोन्ही गोष्टींमधील ज्या गोष्टीची तुम्हाला त्या क्षणी जास्त गरज असेल ती तुम्ही विकत घ्याल.

# ४)गरजांची क्रमवारी लावता येते.

- गरजांच्या तीव्रतेनुसार क्रमवारी लावता येते.अधिक महत्वाच्या गरजा आधी भागविल्या जातात.आणि कमी महत्वाच्या गरजा नंतर भागविल्या जातात.
- उदा.तुमच्या आजारपणात तुमच्या तोंडाला चव नसते.अशा परिस्थितीतही तुम्हाला खमंग  भजी खायला द्यायची की मुगाची साधी खिचडी द्यायची याची गरज ओळखून आई तुम्हाला खायला देते.

# आजारी असताना आई यातील कोणता पदार्थ खायला देईल?





# ५)गरजा बदलणाऱ्याअसतात.

- गरजा ह्या व्यक्तीपरत्वे,कालपरत्वे आणि स्थानपरत्वे बदलतात.उदा.उन्हाळ्यापेक्षा थंडीच्या दिवसात लोकरीच्या कपड्यांची गरज असते.

उन्हाळा

×




हिवाळा

√

# ६) गरजा पुनरुद्भवी असतात.

- काही गरजा कायम पुनरुद्भवी असतात.
- कालांतराने त्या पुनः पुन्हा निर्माण होतात.
- उदा.अन्न,पाणी या गरजा काही कालावधीने पुन्हा निर्माण होतात.

# गरजांचे वर्गीकरण



गरजा
अत्यावश्यक गरजा
अन्न,वस्त्र,निवारा,आरोग्य,शिक्षण
सुखदायी गरजा
फर्निचर,पंखा
चैनीच्या गरजा
वातानुकुलीत गाडी,यंत्र,सोन्याचे मौल्यवान दागिने

# वस्तू

**“मानवी गरज पूर्ण करण्याची क्षमता ज्या बाबीमध्ये असते तिला वस्तू असे म्हणतात.”**

- उदा.भांडी,पुस्तके,खाण्याचे पदार्थ,कपडे इत्यादी
- अशा अनेक वस्तू असतात त्या आपल्या गरजा भागवितात. सगळ्याच वस्तू आपल्या डोळ्यांनी दिसतात असेही नाही.मग या वस्तूंचे वर्गीकरण केले जाते का?
- तर हो;केले जाते.

# वस्तूंचे प्रकार



# वस्तूंच्या प्रकारांचे विशेष

**१)मूर्त वस्तू**

या वस्तू डोळयांनी दिसतात आणि स्पर्शाने जाणवतात.उदा.पुस्तके,फर्निचर इत्यादी.

**२)अमूर्त वस्तू**

ज्या वस्तू डोळयांनी दिसत नाहीत व स्पर्शाने जाणवत नाहीत.उदा.सर्व प्रकारच्या सेवा,नावलौकिक

**३)मुक्त वस्तू किंवा आर्थिकेतर वस्तू**

निसर्गातून मुबलक उपलब्ध झालेल्या वस्तूंना आपण मुक्त वस्तू म्हणतो.या वस्तूंना विनिमय मूल्य द्यावे लागत नाही कि कसलीही किंमत मोजावी लागत नाही.उदा.सूर्यप्रकाश,हवा,पावसाचे पाणी.

**४)आर्थिक वस्तू**

आर्थिक वस्तूंचे स्वरूप दुर्मिळ असते.म्हणूनच त्यांना किंमत द्यावी लागते.त्या वस्तू विनिमय मूल्य असते.उदा.सोने,चांदी,मोटारसायकल इत्यादी.

# वस्तूंच्या बाबतीत आपण पहिले पण मग साधने म्हणजे काय?


**“उत्पादनासाठी  उपयोगात येणाऱ्या व्यक्ती,मालमत्ता,भांडवल,मूर्त व अमूर्त वस्तू इत्यादींना साधने असे म्हणतात.”**


- साधनांबद्दल असे म्हणता येईल की साधने म्हणजे वस्तू आणि सेवांच्या उत्पादनाला सहाय्य करणारे आर्थिक घटक होय.उदा. भूमी,श्रम,भांडवल इत्यादी पायाभूत साधने होत.

# साधनांची दुर्मिळता

- दुर्मिळता म्हणजे मर्यादित पुरवठा होय.उदा.वरील चित्रात आपल्याला वर्गात असलेल्या मुलांच्या संख्येच्या मानाने आंबे कमी आहेत.आपल्या वर्गात ६० मुले आहेत आणि त्यांना देण्यासाठी ३० आंबे आहेत. म्हणजेच मागणीपेक्षा पुरवठा कमी आहे. यालाच दुर्मिळता असे म्हणतात.
- आपण पाठाच्या सुरुवातीलाच पहिले आहे कि मानवाच्या गरजा अमर्याद आहेत.त्यामुळे अमर्याद गरजांच्या मानाने साधनांची दुर्मिळता हा आर्थिक  प्रश्न झाला आहे म्हणून दुर्मिळता हे सर्व आर्थिक समस्यांचे मूळ आहे.असे असले तरी,साधनांच्या दुर्मिळतेच्या समस्येवर मात करण्यासाठी मानवी गरजांवर थोडे नियंत्रण असणे आवश्यक आहे.

# साधनांची दुर्मिळता






https://www.google.co.in/search?q=mangos&source=lnms&tbm=isch&sa=X&ei=Y3smU-

“मानवी गरज पूर्ण करण्याची वस्तूच्या अंगी असलेली शक्ती किंवा क्षमता म्हणजे उपयोगिता होय.”






https://www.google.co.in/search?q=%E0%A4%B6%E0%A5%87%E0%A4%A4%E0%A4%95%E0%A4%B0%E0%A5%80+%E0%A4%A8%E0%A4%BE%E0%A4%82%E0%A4%97%E0%A4%B0+%E0%A4%89%E0%A4







# उपयोगिता म्हणजे काय?

- आपल्याला एखाद्या गोष्टीची किंवा पदार्थाची आवश्यकता असणे म्हणजे उपयोगिता होय.उदा.शेतकऱ्याला नांगराची उपयोगिता असते.मात्र कोळयाला नांगराचा उपयोगिता नसते. अजून एखादे उदाहरण घेऊ विद्यार्थ्याला दप्तराची उपयोगिता असते.पण एखाद्या व्यापाऱ्याला त्याही उपयोगिता नसते.आईला घरात पोळी करताना पोळपाट लाटणे याची उपयोगिता असते पण भाकरी करताना त्याची उपयोगिता नसते.
- उपयोगिता ही मानसशास्त्रीय संकल्पना आहे.
- ती व्यक्तीप्रमाणे,काळानुसार,आणि स्थळाप्रमाणे बदलते.
- हि एक सापेक्ष संकल्पना आहे.
- याची उदाहरणे आपण आत्ताच बघितली आहेत.

# वस्तूंची उपयोगिता





# मूल्य

- अर्थशास्त्रात मूल्याचे दोन अर्थ आहेत.

मूल्य

उपयोगिता मूल्य

येथे वस्तूचे उपयोगाच्या दृष्टीने महत्त्व विचारात घेतात.

विनिमय मूल्य

त्या वस्तूच्या बदल्यात दुसरी वस्तू मिळविण्याची क्षमता विचारात घेतात.

# मूल्याचे दोन अर्थ

- उपयोगिता मूल्य –एखाद्या वस्तूची,पदार्थाची उपयुक्तता म्हणजे उपयोगाच्या दृष्टीने असलेले महत्त्व होय. विनामूल्य वास्तूमध्ये उपयोगिता मूल्य जास्त असते पण विनिमय मूल्य नसते.
- उदाहरणार्थ हवा ही विपुल प्रमाणात मिळणारी गोष्ट आहे.तिला आपल्याला कोणतेही मूल्य द्यावे लागत नाही.

# विनिमय मूल्य

- विनिमय मूल्य म्हणजे एखाद्या वस्तूच्या बदल्यात इतर वस्तू मिळविण्याची त्या वस्तुमधील क्षमता होय.
- उदा.एक गोणी तांदूळ = २ गोणी बाजरी
- या उदाहरणात तांदळाचे विनिमय मूल्य अधिक असल्याने एक गोणी तांदळाच्या विनिमय मूल्यात दोन गोणी बाजरी मिळू शकते.

# विनिमय मूल्य



# किंमत

- तुम्हांला घरी आईबाबा एखादी वस्तू दुकानातून आणायला सांगतात.उदा.एक बिस्किटचा पुडा आणायला सांगतात. तेव्हा ते तुम्हाला काही पैसे देतात.आणि मग तुम्ही दुकानदाराला त्या बिस्किटाच्या पुड्याचे पैसे देऊन तो घरी घेऊन येता.म्हणजेच तुम्ही त्या बिस्किटाच्या पुड्याची किंमत असलेले पैसे देऊन मग तो विकत घेता.यालाच किंमत असे म्हणतात.

# किंमत

## बिस्किटचा पुडा = पैसे






# किंमत

- एखाद्या वस्तूचे विनिमय मूल्य पैशात व्यक्त करणे म्हणजे किंमत होय.
- म्हणजेच वस्तूच्या एका नगाच्या मोबदल्यात दिली जाणारी पैशाची संख्या म्हणजे किंमत होय.
- आपण असेही म्हणू शकतो कि किंमत म्हणजे पैशात दर्शविले जाणारे वस्तूचे मूल्य होय.


# मागणी आणि पुरवठा

√





×



# मागणी

- “अर्थशास्त्रात वस्तू खरेदी करण्याची क्षमता आणि पैसे खर्च करण्याची तयारी याचे पाठबळ लाभलेल्या इच्छेला मागणी असे म्हणतात.”
- अर्थशास्त्रात फक्त इच्छेला महत्त्व असून त्याबरोबरच ती वस्तू खरेदी करण्याची क्षमता आणि पैसेही असणे आवश्यक आहे.
- मागणी नेहमी विशिष्ट किमतीला ठरविक काळात,ठराविक ठिकाणी किती वस्तू खरेदी केल्या जातात या संबंधात दर्शविली जाते.
- विशिष्ट किंमतीला ठराविक कालावधीत खरेदी केलेल्या वस्तूंची संख्या म्हणजे मागणी होय.

# मागणीचे सूत्र

इच्छा

वस्तू खरेदी करण्याची क्षमता

पैसे खर्च करण्याची तयारी


=

मागणी

# पुरवठा

- पुरवठा म्हणजे वस्तूंची नगसंख्या जी बाजारात विशिष्ट किंमतीला,विशिष्ट वेळी आणि विशिष्ट ठिकाणी उपलब्ध केली जाते.
- उदा.आपण घरात खाण्यासाठी वापरतो ती साखर हा पदार्थ आपल्यापर्यंत येण्यासाठी अनेक प्रक्रियांमधून जातो आणि मग सर्वात शेवटी तो आपल्या घरात किराणामालाच्या स्वरुपात येतो.
- मागणी आणि पुरवठ्यामध्ये एक आंतरसंबंध आहे.
- मागणी जास्त पुरवठा कमी असेल तर वस्तूंचा तुटवडा भासतो.याउलट मागणी कमी आणि पुरवठा जास्त असेल तर वस्तूंचे आधिक्य (रेलचेल) होते.

# पुरवठा साखळी


Inter-organisation Supply Chain
MATERIALS
SUPPLIER
SUPPLIER
INFORMATION
CUSTOMER
CUSTOMER
CASH
© Clemiston Consulting 2003

# उपक्रम

- विद्यार्थी मित्रांनो, मला असे वाटते की तुम्हाला अर्थशास्त्रातील या संकल्पना आता छान लक्षात राहतील.मग आपण याविषयी एक छानसा उपक्रम करूयात.
- आता आपण अभ्यासलेल्या संकल्पनांविषयीची चित्रे आणि माहिती तुम्ही जमवा आणि त्यामधून तुम्हाला आवडलेल्या संकल्पनेवर वर्गात छानशी गटचर्चा करा.त्यामुळे तुमचे या संकल्पनांविषयी विचार स्पष्ट होण्यास मदत होईल.
- तुमच्या शंका आणि तुम्ही केलेले उपक्रम खालील mail वर अवश्य पाठवा.
- manishad@mkf.org.in

# मूल्यमापन

जोड्या जुळवा.

| ‘अ’गट | ‘ब’ गट |
| --- | --- |
| १)मागणी | अ) वस्तूचे पैशांतील विनिमय मूल्य |
| २)मानवी गरजा | ब) वस्तूंची नगसंख्या |
| ३)पुरवठा | क)उत्पादनासाठी उपयोगी व्यक्ती,वस्तू इ. |
| ४)साधने | ड)अमर्याद आहेत. |
| ५) किंमत | इ)विशिष्ट किंमत,ठराविक कालावधीत खरेदी केलेल्या वस्तूंची संख्या |

उत्तरे (१-इ,२-ड,३-ब,४-क,५-अ)